Date:- 23/07/2018

# International Yoga Day





Date:-27/09/2018

# Legal Right And Services






Date:-25/07/2018

# Tree Plantation



Date:-09/10/2019

# Swatch Bharat Abhiyan











Date:-09/08/2018

# Art of Living





# Run for Green Marathwada




# पर्यावरण संवर्धनासाठी सतर्क राहावे

**रन फॉर ग्रिन मराठवाडा रॅलीत लातूरकर धावले**




**लातूर(प्रतिनिधी ) :**

वाढत्या तंत्रज्ञानापुढे मोठ्या प्रमाणात आव्हान देणारी गंभीर बाब म्हणजे सध्या वाढत असलेले प्रदुषण. वाढता नैसर्गिक असमतोल. त्यामुळे याबाबतीत पुन्हा नैसर्गिक स्थैर्य निर्माण करायचे असेल प्रत्येकाने आपली नैतिक जबाबदारी समजून पर्यावरण संवर्धानासाठी सतर्क राहणे गरजेचे आहे. असे आवाहन रन फॉर ग्रिन मराठवाडा रॅलीच्या सांगता समारोह प्रसंगी पुण्याच्या टॉलर इंडिया या उद्योग समुहाचे प्रमुख उद्योजक भरत गित्ते यांनी केले आहे.

शनिवार दि. ११ ऑगस्ट रोजी लातूरच्या औसा रोडवरील क्रीडा संकुलावरून टाऊन हॉल पर्यंत काढण्यात आलेल्या रन फॉर ग्रिन मराठवाडा रॅलीच्या सांगता समारोह प्रसंगी ते बोलत होते. एम. एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेज असोसिएशन या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेकडून या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला महापौर सुरेश पवार यांनी हिरवा झेंडा दाखविला. या रॅलीमध्ये लातूरमधील अनेक क्षेत्रातील नामवंत मान्यवरांसह बिडवे इंजिनीअरिंग कॉलेजचे आजी माजी विद्यार्थ्यांनी ही सहभाग नोंदविला होता.

पर्यावरण विषयक जनजागृती करण्यासाठी तसेच वृक्ष लागवड व संवर्धन, पाण्याचे प्रदुषण, पाण्याचा योग्य वापर, स्वच्छता, सध्यस्थितीत असणाऱ्या इंधनामुळे निसर्गावर होणारे दुष्परिणाम, विजेचे, प्लास्टीकचे दुष्परिणाम, तसेच सौर उर्जा व जैवीक उर्जेबद्दल असणाऱ्या सेवा सुविधांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन कसे करता येईल याची माहिती देण्यात आली. झाडे लावा, झाडे जगवा, आपले शहर व परिसर स्वच्छ ठेवा, जैविक व नैसर्गिक उर्जा स्त्रोतांचा अधिका अधिक उपयोग करा. अशा आशयाच्या रॅली दरम्यान रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.मान्यवरांची भाषणेही झाली. यावेळी जमलेल्या नागरिकांना वरील सर्व बाबींची माहिती पटवून सांगून त्यासाठी उपलब्ध असलेल्य शासकीय स्तरावर असणाऱ्या सेवा सुविधांबद्दलही थोडक्यात माहिती दिली.

गित्ते पुढे म्हणाले की, वर्तमान स्थितीत वापरात असणारे उर्जास्त्रोत हे हळू हळू कमी होणारे असून त्यांना पर्यायी स्त्रोतांची निर्मिती करणे गरजेचे आहे. त्याशिवाय या स्त्रोतांतून पर्यावरणाला मारक अशा काही बाबी नसाव्यात. अशा स्त्रोतांमध्ये सौर उर्जा आहे, जैविक उर्जा यांचा उपयोग करुन त्यातून पर्यावरणाचे संवर्धन ही साधता येते.या कार्यक्रमासाठी उद्योजक विनीत कपूर, संतोष सिंघ, विष्णूदास भुतडा, एम. एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेजचे प्राचार्य नरेंद्र खटोड, यांच्यासह एम.एस.बिडवे इंजिनीअरिंग कॉलेज असोसिएशनचे सेक्रेटरी धर्मराज बिराजदार, उपाध्यक्ष प्रा. राजशेखर बिडवे आणि कोषाध्यक्ष प्रा. के. एस. उपासे, प्रा. अविनाश पेंदे, प्रा. चिन्मय पटनायक, प्रा. ज्योती हत्रे, प्रा. अश्विनी बिरादार, प्रा. संजय मंत्री, प्रा. विपूल शहा, प्रा. सोमप्रकाश चौधरी, सुनिल मिटकरी, प्रा. राजेंद्र प्रसाद तसेच महाविद्यालयाचे आजी माजी विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते.

दैनिक यशवंत

रविवार, दि. १२ ऑगस्ट २०१८

# वाढत्या तंत्रज्ञानाला आव्हान देणाऱ्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सतर्क रहावे-गित्ते

## 'रन फॉर ग्रिन मराठवाडा'रॅलीत लातूरकर धावले









